**PRAHAAR**

**Issue date: 16 September 2010**

# ‘कॉर्डलाइफ’ भारतीय बाजारात

मुंबई : स्टेम सेल बँकिंगसाठी प्रसिद्ध असलेल्या कॉर्डलाइफ या कंपनीने मुंबईत नवीन ‘स्टेम सेल’ संकलन केंद्र सुरू करून भारतीय बाजारपेठेत प्रवेश केला आहे. देशातील ‘स्टेम सेल’ संवर्धनाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी पुढील दोन वर्षांमध्ये पश्चिम भारतात ब्रँड उभारणी आणि विपणनासाठी कंपनीने ४ दशलक्ष ऑस्ट्रेलियन डॉलरची गुंतवणूक करण्याचा विचार केला आहे. कॉर्डलाइफने कोलकाता येथे प्रकल्प उभारून आपल्या कामकाजाला प्रारंभ केला. स्टेम सेलचे २ लाख नमुने सांभाळण्याची तसेच त्यावर प्रक्रिया करण्याची या सुविधेची क्षमता आहे. ग्राहकांसाठी कंपनीने ‘मेडिकल कॉन्सर्ज’ आणि ‘क्वालिटी गॅरंटी’ या दोन मूल्यावर्धित सेवाही सुरू केल्या आहेत.